# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक १४६ वा बुधवार दि.०१ नोव्हेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## राज ठाकरे यांचे मनोज जरांगेंना भावनिक पत्र



मुंबई : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांना सविस्तर पत्र लिहिलं आहे. त्यांनी मनोज जरांगे यांच्या उपोषणावरुन सत्ताधा-यांवर निशाणा साधलाय. तसेच त्यांनी मनोज जरांगे यांना उपोषण मागे घेण्याची विनंती केली आहे.'इथली राजकीय व्यवस्था भंपक आहे. त्यांना तुमच्याकडून निवडणुकीत फक्त मतदान हवं आहे. ते एकदा मिळालं की हे आपली सगळी आश्वासनं विसरणार अशी ह्यांची वृत्ती आहे. त्यांना तुम्ही ज्या मागणीसाठी उपोषण करत आहात त्याच्याशी काहीही देणं-घेणं नाही. अशा खोटारड्या, बेफिकीर लोकांसाठी तुम्ही तुमचा जीव पणाला लावणं योग्य वाटत नाही म्हणून तुमचं उपोषण तुम्ही तात्काळ थांबवावं अशी विनंती करायला हे पत्र लिहित आहे'', असं राज ठाकरे म्हणाले आहेत.''तुमच्या मागच्या उपोषणाच्यावेळी हा प्रश्न गुंतागुंतीचा आहे, असं मी तुम्हाला म्हणालो होतो. अशा प्रश्नांना हात घालण्याची या राज्यकर्त्या मंडळींची इच्छा नाही, असंही म्हणालो होतो. नुसतं जातीच्या नावानं मतं मागायची, खोटी आश्वासनं द्यायची असे ह्यांचे उद्योग. आपणही मग भाबडेपणानी ह्यांना मतदान करतो. आपल्या जातीचा म्हणून आपला वाटला, आपल्यासाठी काही करेल असं वाटलं म्हणून ह्यांना मतदान केलंत. एकदा नाही अनेकदा केलंत. त्याचा ह्यांनी गैरफायदा घेतला. ही माणसं फार निष्ठुर आहेत. कोण गेलं, कुणाला इजा झाली ह्या गोष्टींनी यांना काहीही फरक पडत नाही.

## जीवे मारण्याच्या कलमांतर्गत गुन्हा दाखल करणार



मुंबई : मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आंदोलनाच्या मुद्द्यावर भाष्य केलं. कोणाला मारुन टाकण्याचा प्रयत्न , कोणाची मालमत्ता जाळण्याचा प्रयत्न झाला असेल तर ते सहन केले जाणार नाही. त्यांच्यावर जीवे मारण्याच्या कलमांतर्गत गुन्हा दाखल केला जाईल, असं ते म्हणाले आहेत. ते माध्यमांशी बोलत होते. घर जाळण्याचा जो प्रयत्न झाला आहे. त्याचे सर्व सीसीटीव्ही फुटेज मिळाले आहेत. ५० ते ६० लोकांची ओळख पटली आहे. इतर लोकांची ओळख केली जात आहे. या सर्व लोकांवर पोलिस ३०७ च्या अंतर्गत जीवे मारण्याच्या कलमांतर्गत कारवाई करणार आहेत, हिंसा होत असताना पोलिस बघ्याची भूमिका घेऊ शकत नाहीत, असे फडणवीस म्हणाले. दुर्दैवाने अशा प्रकारची हिंसा होत असताना काही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते देखील यात सहभागी असल्याचे समोर आले आहे. याची माहिती लवकरच समोर येणार आहे. बीडमध्ये काही घरं जाळण्याचे, विशिष्ट समुदायाला टार्गेट करण्याचे प्रकार घडले आहेत. काहींचे हॉटेल, दुकाने, हॉस्पिटल जाळण्याचे प्रकार घडले आहेत, असं उपमुख्यमंत्री म्हणाले.हिंसाचार करणा-यांना सोडले जाणार नाही. त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. मराठा आरक्षणाच्या संदर्भात जे आंदोलन सुरु झालंय त्यासंदर्भात सरकार सकारात्मकतेने पाऊल उचलत आहे. मुख्यमंत्र्यांनी स्वत: आरक्षणाबाबत कटिबद्ध असल्याचं सांगितली आहे. त्यामुळे त्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत, असंही ते म्हणाले.

## दसरा महोत्सवाच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचा जागर : आ. कराड



लातूर दि.३१ - : लातूर शहराची जाज्वल्य परंपरा असलेल्या सामुदायिक दसरा महोत्सवाचे यंदाचे ५१ वे - म्हणजे सुवर्ण महोत्सवी वर्ष होते. अशा महोत्सवांमधूनच भारतीय संस्कृतीचा जागर होत असतो. क्षात्रतेजाचा आविष्कार करीत आपल्या प्राचीन संस्कृतीच्या अमूल्य ठेव्याचा प्रकाशझोत या महोत्सवाच्या निमित्ताने लातूरवासियांना अनुभवायला मिळाला, असे प्रतिपादन येथील सामुदायिक दसरा महोत्सवाचे स्वागताध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी केले. महर्षी दयानंद व क्रीडा मंडळ लातूर द्वारा आयोजित सामुदायिक दसरा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी अहोरात्र परिश्रम घेतलेल्या महोत्सव समितीच्या सर्व पदाधिकार्यांचा मानचिन्ह व शाल महर्षी दयानंद आणि श्रीरामाची प्रतिमा भेट देऊन स्वागताध्यक्ष आ. कराड यांनी गौरव केला त्यावेळी ते बोलत होते. पुढील काळात या महोत्सव समितीच्या माध्यमातून राज्यस्तरीय भव्य क्रीडा स्पर्धा, लोककला महोत्सव आयोजित करण्याचा मानस याप्रसंगी आ. कराड यांनी व्यक्त केला. सामुदायिक दसरा महोत्सव समितीचे शहर अध्यक्ष व वनश्री मित्र मंडळाचे संयोजक ईश्वरचंद्र बाहेती, अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष व दसरा महोत्सव समितीचे ग्रामिण अध्यक्ष प्रदिप पाटील खंडापुरकर बाबा, कार्याध्यक्ष जयप्रकाश दगडे, उपाध्यक्ष तथा पतंजली योग समिती महाराष्ट्राचे प्रभारी विष्णुजी भुतडा, दसरा महोत्सव समितीचे मुख्य संयोजक तथा विर यौद्धा संघटनेचे प्रांतीय अध्यक्ष श्रीकांत रांजणकर, संयोजक संतोष तोष्णीवाल, महाराष्ट्र आर्य वीर दलाचे प्रांतीय अध्यक्ष तथा दसरा समितीचे सरचिटणीस व्यंकटेश हालिंगे, महिला पदाधिकारी ॲड. राणिताई स्वामी, महिला अध्यक्षा ॲड. राधिकाताई पाटील, युवती अध्यक्षा योगीताताई ठाकुर उपाध्यक्षा प्रितीताई कोळी कायदेशीर सल्लागार ड. लक्ष्मण शिंदे, ड. शिवलिंग कुरे, शिवाजीराव वाघमारे, डॉ. हनुमंत कोळेकर, शिवराज पानगावे यांचा आ. रमेशअप्पा कराड यांचे हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी अनेकांनी आपले मनोगत व्यक्त करून दसरा उत्सव सर्वांच्या प्रयत्नातून आणि सहकार्यातून यशस्वी झाल्याचे बोलून दाखविले प्रारंभी आ. रमेशअप्पा कराड यांचा जेष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ईश्वर बाहेती यानी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व्यंकटेश हालिंगे यानी तर शेवटे विष्णूजी भुतडा यानी आभार व्यक्त केले.

## मराठे आक्रमक; पुणे-सातारा मार्ग रोखला



पुणे : मराठा आंदोलनाची धग आता पुण्यापर्यंत येऊन पोहचली आहे. आंदोलकांन पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर नवले पुलाजवळ रस्ता अडवला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक विस्कळीत झाली आहे. पाच ते सात किलोमीटरपर्यंत दोन्ही बाजूंनी वाहनांच्या रांगाच रांगा लागल्या आहे. महत्वाचं म्हणजे यात रुग्णवाहिका आणि स्कूलबसेसदेखील अडकल्या आहे. मागील दोन तासांपासून विद्यार्थी आणि रुग्ण तातकळत आहे. शिवाय अनेक नागरिकदेखील वाहतूक कोंडीत अडकले आहेत.पुण्यातील नवले पुलावर मराठे आक्रमक झाल्याचं बघायला मिळत आहे. अनेक मराठा कार्यकर्ते रस्त्यावर उतरल्याचं बघायला मिळत आहे. नवले पुलावर टायरची जाळपोळ करत आहे. रस्त्याच्या मधोमध टायर जाळल्याने नवले पुलाजवळ गोंधळाचं वातावरण निर्माण झालं आहे. परिसरात धूराचे लोट पसरल्याचं बघायला मिळत आहे. त्यामुळे अनेक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. मात्र त्यातच या कार्यकर्त्यांकडून टायरची संख्या वाढवण्यात येत आहे. मागील दोन तासांपासून पूर्ण वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्यातच महिला आणि लहान मुलंदेखील अडकले आहे. अनेक पुणेकरांना आपापल्या कामासाठी रवाना व्हायचं आहे. मात्र ही जाळपोळ पाहून अनेक नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. शिवाय नागरिकांचे कामंदेखील खोळंबले आहे. पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त नागरिकांचे हे हाल पाहून आणि परिस्थिती चिघळत असल्याचं पाहून पोलीस मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहे. वाहतूक कोंडी सोडवून नागरिकांना नीट मार्गस्थ होऊ द्या, अशी विनंती पोलिसांकडून मराठा कार्यकर्त्यांना केली जात आहे. मात्र मराठा कार्यकर्ते त्यांच्या भूमिकेवर ठाम आहेत. त्यांच्याकडून घोषणाबाजी केली जात आहे. रस्त्यांच्या दुतर्फा वाहनांच्या रांगा आहेत आणि मराठा कार्यकर्तेदेखील गर्दी करत आहे. गर्दी वाढण्याची शक्यता असल्याने पोलिसांकडून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

## आ. अभिमन्यू पवार व आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी घेतली मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री भेट





औसा - कायद्याच्या चौकटीत कायमस्वरूपी टिकेल असे आरक्षण मराठा समाजाला लवकरात लवकर देण्यात यावे या मागणीसाठी आमदार अभिमन्यू पवार व आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेऊन या संदर्भात सविस्तर चर्चा केली.

मराठा समाजाची स्थिती दिवसेंदिवस भयानक होत चालली आहे. शिक्षणात आणि नौकरीत आरक्षण नसल्याने समाजातील मुले शिक्षणापासून व नौकरी पासून वंचित राहिली आहेत. यासाठी खऱ्या अर्थाने मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. आजवर सर्व जाती धर्माला सोबत घेऊन आलेल्या या समाजाची आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट आहे. समाजाच्या उपजिवीकेचे शेतजमीन हे साधन असून अल्पभूधारक असलेला समाज निसर्गाच्या लहरीपणामुळे हे क्षेत्र अडचणीत आले असून खऱ्या अर्थाने मराठा समाजाला आरक्षणाची गरज आहे.सध्या मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भातची मागणी जोर धरू लागली असून मराठा आरक्षण संदर्भात औशाचे आमदार अभिमन्यू पवार व तुळजापूरचे आमदार रणजितसिंह पाटील यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत याविषयी सविस्तर चर्चा केली. कायद्याच्या चौकटीत कायमस्वरूपी टिकेल असे आरक्षण मराठा समाजाला लवकरात लवकर देण्यात यावे अशी मागणी यावेळी दोन्ही आमदारांनी केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या संवादातून महायुती सरकार मराठा आरक्षण विषयासंदर्भात गंभीर असल्याचे जाणवले, सकल मराठा समाजाला लवकरच कायमस्वरूपी टिकणारे आरक्षण मिळेल असा विश्वास असल्याचे यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

## राजस्थान विधानसभा निवडुकीसाठी काँग्रेसची चौथी यादी जाहीर



नवी दिल्ली : राजस्थान विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने चौथी यादी जाहीर केली आहे. या यादीत ५६ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये श्रीगंगानगरमधून सोहनलाल, उदयपूरमधून गौरव वल्लभ, बयानामधून अमरसिंह जाटव, अनुपगढमधून शिमला देवी नायक यांना काँग्रेसने उमेदवारी दिली आहे. तर पायलट गटाचे आमदार खिलाडी लाल बैरवा यांचे तिकीट रद्द करण्यात आले आहे.शिवप्रकाश गुर्जर यांना नशिराबादमधून मैदानात उतरवण्यात आले आहे. बिकानेर पूर्वमधून यशपाल गेहलोत, पिलीबंगामधून विनोद गठवाल, श्रीमधापूरमधून दीपेंद्र सिंह शेखावत, सिवानामधून मानवेंद्र सिंह, राणीवाडामधून रतन देवासी, खंडेलामधून महादेव सिंग यांना उमेदवारी देण्यात आली आहे.काँग्रेसने पुन्हा एकदा मंडलमधून महसूल मंत्री रामलाल जाट यांना उमेदवारी दिली आहे.बुंदीमधून हरिमोहन शर्मा यांच्या नावाला मंजुरी देण्यात आली आहे. इमरान खान यांना तिजारा येथून तिकीट देण्यात आले आहे. विशेष म्हणजे, बसपानेही यापूर्वी इमरान खान यांना उमेदवार म्हणून घोषित केले आहे. ज्येष्ठ नेते दुर्रुमिया यांचे तिकीट रद्द करण्यात आले आहे.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# शेतकऱ्यांच्या जिवा-वर सरकार उदार

पाच राज्यांत निवडणूक लागली, म्हणून सरकार आता अन्नधान्याची महागाई आटोक्यात ठेवण्याचा आटापिटा करणार तोही शेतकऱ्याला चिमटा काढूनच पण निर्यातबंदीसारख्या उपायांमुळे आपली कृषी-निर्यातवाढ 'यूपीए'च्या काळात ज्या वेगाने होत होती तो मंदावलाय, हे आजच्या सत्ताधाऱ्यांना माहीत आहे का? अशोक गुलाटी अन्नधान्य-महागाईवर आटोक्यात आणण्यासाठी केंद्र सरकारचा जे काही आटापिटा हल्ली चालू झालेला दिसतो, त्याचे कारण शोधणे मध्य प्रदेश, तेलंगणा अशा काही राज्यांच्या निवडणुका जाहीर झाल्या आ-हेत हे लक्षात घेतल्यास कठीण नाही! निवडणुकीच्या प्रचारात कोणाही सत्ताधाऱ्यांना महागाई हा मुद्दा होऊ द्यायचा नसत-ोच. पण अन्नधान्याच्या महागाईवर नियंत्रण कसे आणणार, मुख्य म्हणजे या नियंत्रणाचा भुर्दंड कोणाला सोसावा लागणार किंवा कोणाच्या जिवावर अन्नधान्य-स्वस्ताई आणणार, याचे विश्लेषण करणे महत्त्वाचे आहे, कारण त्याशिवाय 'आपली धोरणे तर्कसंगत असावीत' ही साधी अपेक्षा पूर्ण होणार नाही. नमुनेदार उदाहरण म्हणजे, बासमती तांदळाच्या निर्यातीला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने बासमतीची 'किमान निर्यात किंमत' (एमईपी - मिनिमम एक्स्पोर्ट प्राइस) यंदा १२०० अमेरिकी डॉलर प्रतिटन अशी ठेवली आहे. भारतातून गेल्या पाच वर्षांमध्ये सरासरी साडेचार दशलक्ष टन वर्षाला निर्यात होत आहे. बासमती हा एक उच्च दर्जाचा वाण आहे जो भारतात उच्च मध्यमवर्गीय वा श्रीमंत लोक वापरतात पण आखाती देशांमध्ये, काही युरोपीय देशांमध्ये तसेच अमेरिकेत तो निर्यात केला जा-तो. पंजाब आणि हरियाणा हे बासमतीचे मुख्य उत्पादक. या तांदळाची निर्यात किंमत साधारणपणे ८०० डॉलर ते १००० डॉलर प्रतिटन दरम्यान असते. त्याऐवजी 'किमान निर्यात किंमत' १२०० डॉलर ठेवल्याने व्यावहारिकदृष्ट्या, बासमतीच्या निर्यातीवर आडून बंदी घातल्यासारखाच परिणाम होणार आणि ही निर्यात घटणार, हे उघड आहे.ही किमान निर्यात किंमत जाहीर झाल्यावर पंजाब -हरियाणातील अनेक मंडयांमध्ये आडत-व्यापारी या तांदळाची खरेदी करण्यास आखडता हात घेऊ लागले आहेत आणि परिणामी, शेतकऱ्यांच्या किंमती जेव्हा बासमतीची निर्यात पूर्णपणे खुली असताना होत्या त्यापेक्षा कमी होत आहेत. म्हणजे किमान निर्यात किमतीमुळे होणारे नुकसान शेवटी पंजाब आणि हरियाणाचे शेतकरीच भोगणार आहेत, तर फायदा होणार तो शहरी उच्चवर्गीय ग्राहकांना! याला दुसरी बाजूही आहे. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की निर्यात बाज-ारपेठ विकसित होण्यासाठी अनेक वर्षे लागतात आणि एवढी महाग 'किमान निर्यात किंमत' ठेवण्याचे बंध घालून भारत मुळात आपली निर्यात बाजारपेठ पाकिस्तानकडे सोपवत आहे! होय, कारण बासमती तांदळाच्या बाबतीत पाकिस्तान हाच भारताचा एकमेव मुख्य प्रतिस्पर्धी आहे. हा असला निर्णय काय 'जाणीवपूर्वक आखलेल्या धोरणाचा भाग' म्हणता येईल का? कृषी-निर्यातीचे आपण काय नि केवढे नुकसान करत आहोत, याची कल्पना तरी आपल्या व्यापार धोरणकर्त्यांना आहे का? वास्तविक आत्ताच्या घडीला या 'एमईपी'चा फेरविचार शक्य तितक्या लवकर करण्याची आणि सुधारित एमईपी शक्यतो ८०० डॉलर ते ८५० डॉलर प्रतिटन यांदरम्यान ठेवण्याची गरज आहे.किमान निर्यात किमतीच्या मार्गाने प्रतिबंधात्मक निर्यात धोरणे केवळ बासमती तांदळापुरती मर्यादित नाहीत. अगदी तुकडा तांदूळ, नॉन-बासमती पांढरा तांदूळ, उकडा तांदूळ, यांच्यावरही एकतर पूर्ण निर्यात बंदी आहे किंवा निर्यात शुल्क वाढवून ठेवले गेले आहे. असल्या अर्धकच्च्या, प्रतिक्रियात्मक निर्णयांपेक्षा आपल्याला गरज आहे ती स्थिर निर्यात धोरणा-ची. हे सर्वज्ञात आहे की २०२२-२३ मध्ये जागतिक तांदूळ-निर्यातीत सुमारे ४० टक्के वाटा मिळवून भारत हा तांदळाचा जगातील सर्वात मोठा निर्यातदार ठरला. बिगर-बासमती तांदूळ अनेक आफ्रिकन देशांमध्ये जातो,त्यामुळे तांदळाच्या या वाणांवर आपण निर्यातबंदी घातली तेव्हा हे देश बिथरलेच. हे प्रकार आपण करत राहिल्या 'ग्लोबल साउथचे नेते' म्हणून आपली प्रतिमा कशी काय तयार करता येणार आहे? त्यातल्या त्यात बरी बाब एवढीच की, याच निर्यात(बंदीच्या) धोरणात कलम होते ज्यात नमूद केले होते की काही देशांनी भारत सरकारला पत्र लिहिल्यास ते त्यांच्या विनंतीवर प्रत्येक प्रकरणाच्या आध-ारावर विचार करू शकतात. त्यामुळे काही आफ्रिकी देशांना आपण अखेर तांदूळ विकला, पण निर्यात धोरण तयार करण्याचा हा काही धडका मार्ग नव्हे.आपल्या या प्रतिबंधात्मक निर्यात धोरणाचा विस्तार गहू निर्यात बंदी, कांद्यावर ४० टक्के निर्यात शुल्क असा वाढतोच आहे. धोरणे ही अशी असतील तर, भारताची कृषी-निर्यात दुप्पट करण्याचे स्वप्न कसे काय पाहता येईल? पण तरीही सरकारने मात्र तसे लक्ष्य ठरवले आहे! इथे हे लक्षात घ्यावे की यूपीए सरकारच्या काळात, २००४-०५ मध्ये (म्हणजे यूपीएने सत्ता हाती घेतली त्या वर्षी) भारताची कृषी निर्यात अवघी ८.६७ अब्ज डॉलर होती, ती २०१३-१४ मध्ये- म्हणजे यूपीए सरकारच्या शेवटच्या वर्षी ४३.२७ अब्ज डॉलरवर पोहोचली होती याचा अर्थ दहा वर्षांत अगदी यूपीएच्या काळातसुद्धा कृषी निर्यातीमध्ये जवळपास पाचपट वाढ झालेली आहे. विद्यमान सरकारच्या एनडीएच्या आतापर्यंतच्या कारकीर्दीत हीच गती कायम राहिली असती तर कृषी-निर्यात २०० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली असती. परंतु प्रत्यक्षात, हे आकडे चालू वर्षी (२०२३-२४) ५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचू शकत नाहीत अशी स्थिती आहे.या अपयशाचे प्रमुख कारण हे शेतकऱ्यांना चिमटा काढून देशांतर्गत ग्राहकांना अनुकूल (स्वस्त) किमती देण्यासाठी निर्यात रोखण्यामध्येच सापडते. शहरातल्या, शेतीचे तोंडही न पाहणाऱ्या 'सामान्य माणसां'वर आपले सरकार इतके मेहेरबान की, त्यापायी आपल्याच (सामान्य) शेतकऱ्यांवर मोठ्या प्रमाणात 'छुपा कर' लादला जातो आहे, याची जाणीवही कोणी ठेवत नाही. वास्तविक शेतकऱ्याचे भले करायचे असेल, देशाची निर्यात वाढवायची असेल तर वर्षानुवर्षे सातत्यपूर्ण प्रयत्न करावे लागतात, तर इथे उलटच. कृषी-निर्यात धोरणे आखण्याचा हा असला मार्ग काय कामाचा?बरे, जर देशांतर्गत ग्राहकांना मदत करायचीच असेल, तर ती देशांतर्गत उत्पन्न(वाढ) धोरणाद्व-ारे असली पाहिजे. या हेतूने समाजातील केवळ असुरक्षित घटकांकडे लक्ष पुरवले जाऊ शकते. जेव्हा 'निती आयोगा'च्या बहुआयामी दारिद्र्यरेषेनुसार गरिबी १५ टक्क्यांच्या आसप-ास आहे आणि जेव्हा ८० कोटींपेक्षा अधिक लोकांना गहू/ तांदूळ (पाच किलो प्रतिव्यक्ती दरमहा) मोफत मिळतात तेव्हा बासमतीवर प्रतिटन १२०० डॉलरची किमान निर्यात किंमत लादण्यामागचे तर्कशास्त्र समजण्याच्या पलीकडचेच ठरते. या असल्या धोरणांपायी भारतीय तांदूळ व्यापाऱ्यांचे अनेक वर्षांचे कष्ट पाकिस्तानच्या ओटीत टाकणे हे तर संतापजनकच म्हटले पाहिजे.

# ओबिसी आरक्षणाचे जनक डॉ बाबासाहेब आंबेडकरच

भारतात अनेक संस्कार दिले जातात. आपण आपले संस्कार जपून संस्कृती चे पालन करावे अशी शिकवण मोठ्यांकडून लहानांना मिळत असते. संस्कार जपण्यासाठी अनेक म्हणीची निर्मिती देखील झा-लेली आहे. जसे ज्याचे खावे मिठ त्याचे काम करावे निट, पाखातील काटा काढणाऱ्या लोकांचे उपकार कधी विसरू नये. वरील म्हणीचा अर्थ हाच आहे की कोणी आपल्यासाठी थोड जरी काही केले तरी-ही त्याचा विसर आपल्याला पडू नये. परंतु हे संस्कार आपल्याला भारतीय संविधान, फुले शाहु आंबेडकर यांच्या बाबतीत दिसून येत नाहीत. भारतीय संविधान व फुले शाहु आंबेडकर यांनी माणसावर व देशावर केलेल्या उपकाराची जाणीव खुप कमी लोकांना आहे. स्वतः ला सुशिक्षित समजणारे लोकही संविधान व फुले शाहु आंबेडकर यांना समजून घेऊ शकले नाही याचे उत्तर आहे केवळ आणि केवळ मानसिक गुलामी. मानसिक गुलामी खुप घातक असते म्हणून महात्मा फुले यांनी पुस्तक लिहले गुलामगिरी, बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हण-तात गुलामांना गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल. थोडक्यात आज सर्वात मोठी समस्या आहे ती गुलामी. हि गुलामी तोडल्या शिवाय माणसाची व देशाची प्रगती होणे शक्यच नाही. वैचारिक व मानसिक स्वातंत्र्यावर प्रबोधन आणि जागृती करणारे लोकच मानसिक गुलामांना आपले शत्रु वाटतात. शिक्षण घेऊन ही जाती धर्माचा आणि अंधविश्वासाचा पगडा मजबूत झाला आहे. अंधविश्वासावर बोलले तर धार्मिक भावना दुखतात, पाखंड, थोतांड यावर बोलले तर धार्मिक भावना दुखतात पण महापुरुषांच्या विचारांची व कार्यांची यांना थोडी ही जाणीव नाही तेव्हा कोणाच्या ही भावना दुखत नाहीत एवढी मानसिक गुलामी आहे. मानसिक गुलामी असलेले लोक चुकिच्या व फसवेगिरी च्या गोष्टी तात्काळ स्विकारतात परंतु सत्य आणि जागृती च्या गोष्टी बऱ्याच लोकांना पचत नाही कारण ते आजही मानसिक गुलामच आहेत. आज हक्क अधिकार, शिक्षण नोकरी सर्वांनाच पाहिजे परंतु ते निर्माण करणाऱ्या महापुरुषांचे नाव घेण्याचे घाडस होत नाही एवढे लोकांचे मन कमकुवत झाले आहे. काही लोक संविधान, आरक्षण याची मांडणी चुकिच्या पद्धतीने करून स्वतः ची विद्धता दाखवण्याचा प्रयत्न केला जातो परंतु स्वतः ची विद्वता दाखवण्याच्या नादात स्वतः चे अज्ञानच दाखवून मोकळे होतात. बरेच महाशय म्हणतात ओबिसींना आरक्षण संविधानाने अर्थात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले नाही तर ओबीसींना आरक्षण १९९२ साली लागु झाले आणि बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण १९५६ ला झाले. म्हणून आरक्षण हे बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेच नाही असा तर्क काही लोक लावून आपले अज्ञान दाखवतात. आरक्षणाचा मुळ विरोधक कोण हेच मुळात कोणाला समजले नाही. आणि जाती चा पडगा असल्याने त्यांना विरोधक कळणार ही नाहीत. कारण आरक्षणाचे विरोधकांनीच यांना गुलाम बनवून ठेवले आहे. संविधान व संविधान समितीचे भाषणे कधीच न वाचलेल्या लोकांनी आरक्षणावर बोलुन दिशाभूल करून वा-तावरण दुषीत करू नये. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी जेव्हा आरक्षणा बद्दल संविधानामध्ये तरतूद करायची तेव्हा ३४० नुस-ार ओबीसी, ३४१ नुसार आणि ३४२ नुसार एस टी आरक्षणाची तरतूद करून घेतली. परंतु जेव्हा यावर चर्चा झाली तेव्हा मात्र ओबीसी अर्थात ३४० ला सर्वांनी विरोध केला. कलम क्रमांक ३४१ व ३४२ ला डॉ बाबासाहेब आंबेडकर मान्यता मिळवून घेऊ शकले परंतु मोठ्या प्रमाणात संविधान सभेत ओबीसी चे असलेले प्रतिनिधी च डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना ओबीसी नेमके कोण असा प्रश्न विचारून ओबिसी चे आरक्षण नाकारून कलम क्रमांक ३४० रद्द करण्याची मागणी केली. परंतु डॉ बाबासाहेब आंबेडकर कलम ३४० वर ठाम होते त्यांचे मत स्पष्ट होते ते म्हणजे एस सी आणि एसी समुदाया प्रमाणेच एक मोठा समुदाय जातीव्यवस्थे नुसार शैक्षणिक व सामाजिक दृष्टीने मागास आहे. त्यांना ही आरक्षणाची गरज आहे. परंतु त्यावेळी ३४० कलमावर सर्वात जास्त चर्चा होऊन मुळ ओबिसी मध्ये येणाऱ्या प्रतिनिधींनी च ओबिसी च्या आरक्षणाचा विरोध केला. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या वर अनेक प्रकारे अनेक अन्याय अत्याचार झाले होते पण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी कोणावरही अन्याय होणार नाही याची काळजी घेतली. म्हणून ओबीसी प्रवर्गाला ओबिसी च्याच प्रतिनीधी कडून विरोध झाला, कलम रद्द करण्याची मागणी झाली तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ३४० कलम रद्द केले नाही. कलम तसेच ठेवून त्यामध्ये त्यांनी इतर मागास जातीचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रपती तात्काळ समीतीचे गठण करतील व समितीच्या अहलानुसार मागास जातींच्या कल्याणासाठी सरकार उपाय योजना करेल अशी तरतूद करून ओबिसींचा विरोध असताना ही ओबीसींना अस्तीत्व निर्माण करून दिले. म्हणून ते महामानव आहेत. संविधान लागु झाल्याबरोबर तिनच वर्षात अर्थात २९ जानेवारी १९५३ ला कलम क्रमांक ३४० नुसार कालेलकर समीती स्थापण करण्यात आली. आणि या समितीने २३९९ जाती ओबीसी प्रवर्गासाठी शोधुन काढल्या परंतु तत्कालीन सरकारने कालेलकर आयोगावर आक्षेप घेऊन ओबीसी आरक्षण नाकारले. त्यानंतर ओबीसी आरक्षण मुद्दा तसाच रेंगाळत पडला. ओबिसी चे नेते जागृत नसल्याने आणि संविधान बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहले म्हणून जातीव-ादी माणसिकतेच्या लोकांनी संविधान वाचलेच नाही आजही बहुसंख्य लोकांनी ते वाचले नाही. परंतु समोर कालेलकर आयोगावर पुन्हा चर्चा झाली. कालेलकर आयोगाच्या शिफारशी मान्य नसतील तर नवीन आयोग स्थापन करण्यासाठी १९७९ साल उजाडले. १९७९ साली इतर मागास वर्गीय जातीचा अभ्यास करण्यासाठी मंडल आयोगाची स्थापना करण्यात आली . मंडल आयोगाने अकरा मुद्यावर मागास जातीचा अभ्यास करून ३७४३ जाती ह्या शोधुन काढल्या. अर्थात १९८० च्या दशकात ३७४३ जाती शोधुन त्यांचा ओबीसी मध्ये समावेश केला तेव्हा त्यांची एकुण लोकसंख्येची टक्केवारी ५२% होती. १९३१ नंतर जातवार जनगणना झाली नाही केवळ मंडल आयोगा नुसार ओबीसीची संख्या १९८० च्या दशकात ५२% असून या आयोगाच्या शिफारशी लागु झाल्या १९९० दशकात. आणि तेव्हा कुठे देशात ओबीसी आरक्षण लागु झाले. महाराष्ट्र पंचायत राज च्या निवडणुका १९९४ ला झाल्या आणि ओबीसींना राजकीय आरक्षणही बहाल करण्यात आले. आता मुळ मुद्दा हा आहे की ओबीसी कलमाला प्रस्थापित लोकांनी विरोध केला तरीही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ते कलम रद्द न करता तसेच ठेवून आयोगाची स्थापना करण्याचा अट्टाहास सोडला नाही. ओबीसी नेत्यांनी व सरकारने ओबीसींना जास्त गांभीर्याने न घेता केवळ त्यांचा वापर करून घेऊन १९५० ते १९९१ पर्यंत ताटकाळत ठेवले. संविधाना मध्ये तरतूद असूनही जवळपास ४० वर्ष ला-वले. आणि संविधानात जर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी तरतूद च केली नसती आज आज ओबीसी यांना कोणतेही हक्क अधिकार मिळाले नसते. परंतु कोणावरही अन्याय न होता सर्वांना समान न्याय देण्याची क्षमता डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्येच होती म्हणून बाबासाहेब आंबेडकर यांचा खुप छळ झाला तरीही त्यांनी इतरांचा छळ होऊ नये म्हणून काळजी घेतली. परंतु याची जाणीव लोकांना राहली नाही. तरीही सत्य इतिहास कधी लपत नाही. भांडून ओबीसी चे अस्तित्व व हक्क अधिकार आणि आरक्षण संविधानीक चौकटीत बंद करून त्यांचे रक्षण करून खऱ्या अर्थाने ओबिसीच्या आरक्षणाचे जनक डॉ बाबासाहेब आंबेडकर ठरतात. ओबिसी चे आरक्षण लागु करण्यासाठी सरकारने व ओबिसी नेत्यांनी उशीर केला म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ओबिसींना आरक्षण दिले नाही असे म्हणणे म्हणजे केवळ स्वतः चे अज्ञान दाखवणे होय. हिंदु महिलांच्या उत्थानासाठी हिंदु कोड बिल पास होत नाही म्हणून मंत्रीपद सोडणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर एकमेव लोकनेता आहेत. परंतु अंगावर महागडी साडी, महागडे घर, पगार, बोलण्याचा, लिहण्याचा, फिरण्याचा, प्रसुती रजेचा, शिक्षणाचा हक्क बहाल करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर आहेत याची जाणीव खरचं किती महिलांना आहे? पायातील काटा काढल्याचे उपकार जाना अशी शिकवण देणारे लोक ओबिसीचे व महिलांचे जिवन सुखमय आनंदी व सोन्याचे बनवणारे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल एकही शब्द बोलत नाहीत तेव्हा यांच्या गुलामीची किव येते. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे उपकार कोणीच फेडू शकत नाहीत. फक्त याची जाणीव असण्यासाठी माणसाकडे प्रामाणिक मन असने आवश्यक आहे.



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# धाडसी निर्णय घेणाऱ्या बेडर पंतप्रधान-इंदिरा गांधी

आपल्या पित्याकडुन मोठया हिम्मतीने, आत्मविश्वासाने व युगधारणेने इतिहासाचा वारसा प्रियदर्शनीने निर्भयपणे स्विकारला आहे. काळाने मोठया कौशल्याने तिला आमच्या देशाच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र ठरविले आहे. जे कधीही पडद्याआड होऊच शकत नाही. कारण आपली भुमिका इतिहासाच्या रंगभुमीवर यथायोग्यपणे पार पाडीत असतांना अमिट असा ठसा उमटविणे ही गोष्ट सुध्दा साधी असुच शकत नाही.

१९ नोव्हेंबर १९१७ रोजी अलाहाबाद येथील 'आनंदभवन' या वास्तूत त्यांचा जन्म झाला. आजोबा मोतीलालजी 'इंदिरा' या लाडीक नांवाने पुकारायचे, तर वडील नेहरुजी त्यांना 'प्रियदर्शनी' म्हणून संबोधायचे. लहानपणापासूच स्वदेशी आणि स्वदेश यांचे प्रेम त्यांच्या मनात निर्माण झाले होते. विदेशी खेळणी, कपडे यांचा त्यांना तिटकारा होता. एकदा तर त्यांनी विदेशी कपडे होळीत टाकुन दिले. वयाच्या तेराव्या वर्षी म्हणजे १९३० साली त्यांनी आपल्या सवगडयांची वानर सेना स्थापन करुन नेत्यांचे संदेश पोहचवण्याचे काम केले. ब्रिटीशांच्या विरोधात मिरवणूका काढल्या, घोषणा दिल्या या सर्वांच्या बरोबरीने शिक्षणही चालूच ठेवले. प्रारंभी अलाहाबाद मग पुणे आणि नंतर रविद्रनाथांच्या शांतीनिकेतन मध्ये त्यांनी शिक्षण घेतले. पुढील शिक्षणासाठी फिरोज गांधी परिचित असलेल्या हुशार आणि अन् उमद्या तरुणाच्या सांगण्यावरुन इंदिराजींना ऑक्सफोर्ड विद्यापीठात दाखल करण्यात आले. त्यात त्यांनी राज्यशास्त्र, इतिहास व अर्थशास्त्र या विषयांत प्राविण्य मिळविले. विद्यापीठाने त्यांना मानद पदवी दिली. २०१० मध्ये ऑक्सफोर्ड विद्यापीठातील १० नामांकित आशियाई पदवीधरांपैकी ऑक्साशियन म्हणुन त्यांची निवड केली.

याकाळात पंडितजींनी इंदिराजींना जी पत्र पाठवली त्याद्वारे त्यांना संबंध भारताच्या इतिहासाची पुरेपूर जाणीव झाली. याच काळात हिटलरने इंग्लंडवर हल्ले चढवायला प्रारंभ केला. वातावरण चिघळत चाललेले असल्यामुळे विमानाने एकटया इंदिराजी भारतात परत आल्या. त्यांच्या साहसाचे साऱ्यांनी कौतुक केले. मागोमाग फिरोज गांधीही भारतात आले. ब्रिटन मधील वास्तव्यात दोघांच्या भेटी नेहमी होत असंत. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस मध्ये दोघेही सदस्य होऊन राजकारणात सक्रिय झाले. वडील जवाहरलाल नेहरु, विजयालक्ष्मी आणि कृष्ण या आत्यांचा विरोध असतांनाही इंदिराजींचा २६ फेब्रुवारी १९४२ रोजी फिरोज गांधी यांच्याशी आंतरजातीय पध्दतीने विवाहबध्द झाल्या. या जोडप्याला राजीव आणि संजीव या दोन देखण्या मुलांना वाढवत त्यांनी एकीकडे नेटका संसारही केला, सोबत राजकारण होतेच. इंदिरा एक भारतीय राजकारणी आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रमुख नेत्या होत्या. १९४७ ते १९६४ या काळात नेहरुंच्या पंतप्रधानपदाच्या काळात इंदिरा गांधींना प्रमुख सहाय्यक मानले जात होते आणि त्यांच्या अनेक परदेश दौऱ्यांवर त्या नेहरुंसोबत असायच्या. १९५९ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. १९६४ मध्ये त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर गांधींची राज्यसभा सदस्य म्हणून नियुक्ती झाली आणि माहिती व प्रसारण मंत्री म्हणून लाल बहादूर शास्त्री यांच्या मंत्रिमंडळाच्या त्या सदस्या बनल्या. १९६६ च्या सुरुवातीला (शास्त्री यांच्या निधनानंतर) झालेल्या काँग्रेस पक्षाच्या संसदीय नेतृत्वाच्या इंदिरा गांधी नेत्या बनल्या आणि शास्त्री यांच्या मृत्यूनंतर भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांची जागा घेतली. १९६६ ते १९७७ पर्यंत देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणुन मोठी भुमिका बजावली. १९६९ ला त्यांनी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. त्यांनी गरीबी हटविण्यासाठी प्रथम १० कलमी कार्यक्रम राबविला.

जवाहरलाल नेहरूंच्या मृत्यनंतर लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. यात त्यांनी माहिती व नभोवाणीमंत्री हे पद सांभाळले. याचदरम्यान त्यावेळच्या मद्रास राज्यात हिंदीला राष्ट्रीय भाषा घोषित करण्याविरोधात दंगे उसळले होते, तेव्हा त्यांनी मद्रासला भेट दिली. शासकीय अधिकारी, सामाजिक नेते यांची भेट घेऊन राग शांत करण्याचा प्रयत्नत केला. १९६५ चे भारत-पाक युद्ध या दरम्यान त्या श्रीनगरच्या आसपास सुट्या व्यतीत करत होत्या. पाकिस्तानी सैन्य फार जवळ पोहोचले आहे असे संदेश भारतीय सैन्याकडून मिळूनही त्यांनी जम्मू अथवा दिल्ली येथे जाण्यास नकार दिला. अशा प्रकारच्या धाडसी कामांमुळे त्यांची लोकप्रिय छबी निर्माण करण्यात त्या यशस्वी झाल्या. पाकचे आक्रमण परतून लावण्यात भारताला यश आले. १९६६ च्या जानेवारी महिन्यात तत्कालीन सोव्हियत संघात ताश्कंद येथे पाकिस्तानचे अयूबखान आणि लालबहादुर शास्त्री यात शांति समझोता झाला. पण त्यानंतर काही तासातच त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. यानंतर भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पंतप्रधान पदासाठी स्पर्धाच सुरू झाली. मोरारजी देसाई यांनी आपला अर्ज भरला. पण तत्कालीन काँग्रेस अध्यक्ष कामराज यांनी अंतर्गत राजकारणातून इंदिरा गांधींना पाठिंबा दिला.



सतत भारतावर आक्रमण करणाऱ्या भारताने १९७१ डिसेंबर ला युध्दाची घोषणा केली. पाकिस्तानच्या पूर्व बंगाल मधील गांजलेल्या प्रजेला स्वतंत्र करण्यासाठी लष्करी मदत करुन त्यांनी भारत दृष्टया पाकिस्तानचे बांग्लादेश व पाकिस्तान असे दोन तुकडे केले, बांग्लादेशची निर्मीती. तसेच या विजयामुळे दक्षिण आशियामध्ये भारताचा प्रभाव वाढला. त्यानंतर लगेच बांग्लादेशचे वंगबंधु शेख मुजबीर रेहमान म्हणुन पहिले राष्ट्रपती घोषित करण्यात आले. त्यांची सामान्य कामगिरी लक्षात घेवून राष्ट्रपती व्ही.व्ही. गिरी यांनी १९७१ मध्ये 'भारतरत्न' किताबाने सन्मानित केले. बांग्लादेशच्या उभारणीवेळी त्यांची भूमिका आणि देशाला अणुशक्ती संपन्न बनविण्याचा त्यांचा निर्णय भारताला प्रगतीपथावर नेणारा होता. त्याचप्रमाणे भारतीय वैज्ञानिकांकडुन अवकाशात उपग्रह सोडुन भारताचा जगात दबदबा निर्माण केला. २०२० मध्ये गेल्या शतकाची व्याख्या करणाऱ्या जगातील १०० शक्तिशाली महिलांमध्ये टाइम मासिकाने इंदिरा गांधींचा समावेश केला.

अलिप्ततावादी प्रवृत्तींचा हवाला देत आणि क्रांतीच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून इंदिरा गांधींनी १९७५ ते १९७७ पर्यंत आणीबाणीची घोषणा केली. आणीबाणीच्या काळात मूलभूत नागरी हक्क निलंबित केले गेले आणि प्रसार माध्यमांवर निर्बंध लावले गेले. या काळात मोठ्या प्रमाणावर अत्याचार केले गेले. १९८० मध्ये मुक्त आणि निष्पक्ष निवडणुकांनंतर इंदिरा गांधी या पुन्हा सत्तेवर आल्या.

२०११ मध्ये इंदिरा गांधींना बांग्लादेशच्या मुक्तिसंग्रामातील त्यांच्या 'उत्कृष्ट योगदानासाठी' बांग्लादेश स्वाधीनता सन्मान हा बांगलादेशचा सर्वोच्च नागरी पुरस्कार मरणोत्तर बहाल करण्यात आला. अमेरिकन दबाव असताना देखील पाकिस्तानला पराभूत करून पूर्व पाकिस्तानचे स्वतंत्र बांगलादेशात रूपांतर करणे हा इंदिरा गांधींचा मुख्य वारसा खंबीरपणे उभा आहे. इंदिरा गांधी यांच्यामुळेच भारत हा अण्वस्त्रधारी देशांच्या गटात सामील होऊ शकला. भारत हा अधिकृतपणे अलिप्ततावादी चळवळीचा भाग असूनही, त्यांनी भारतीय परराष्ट्र धोरणाला सोव्हिएत गटाकडे झुकवले. १९९९ मध्ये बीबीसीने आयोजित केलेल्या ऑनलाइन सर्वेक्षणात वुमन ऑफ द मिलेनियम असा इंदिरा गांधींचा गौरव केला गेला. २०१२ मध्ये आउटलुक इंडियाच्या महान भारतीयांच्या सर्वेक्षणात त्या सातव्या क्रमांकावर होत्या.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत काँग्रेस पक्ष ही 'ब्रॉड चर्च' मानली जात होती; तथापि, आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींच्या कुटुंबाने नियंत्रित केलेल्या कौटुंबिक फर्ममध्ये काँग्रेसचे रूपांतर होऊ लागले. ही कुटुंबाप्रती निष्ठा नंतर गांधी कुटुंबातील सदस्यांच्या वंशपरंपरागत सत्तेत बदलत गेली. त्या हतबल झाल्या नाहीत. उलट त्या टिकेला सामोरे गेल्या. धाडसी व्यक्तिचं असंच असतं, ते कशाचीही तमा करीत नाही. इंदिरा गांधी यांच्या असुरक्षिततेच्या भावनेमुळे कार्यकारिणीपासून न्याय व्यवस्थेपर्यंत भारताच्या सरकारच्या सर्व भागांमध्ये पद्धतशीर भ्रष्टाचार हा देखील त्यांचा वारसा असल्याचे काही लोक टीका करतात. आणीबाणीच्या काळात स्वीकारण्यात आलेली भारतीय राज्यघटनेची ४२ वी घटना दुरुस्ती देखील इंदिरा गांधी यांच्या वारशाचा भाग मानली जाऊ शकते. न्यायालयीन आव्हाने आणि बिगर काँग्रेस सरकारने या दुरुस्तीवर पाणी टाकण्याचा प्रयत्न केला असला तरी ही दुरुस्ती अजूनही कायम आहे. मारुती उद्योग कंपनीची स्थापना इंदिरा यांचे पुत्र संजय गांधी यांनी प्रथम केली असली, तरी इंदिरांच्या काळात ही राष्ट्रीयीकृत कंपनी प्रसिद्ध झाली. आजही ती नांवरुपास आलेली आहे.

भारता सारख्या खंडप्राय देशाच्या दिर्घकाळ पंतप्रधान राहिलेल्या त्या एकमेव नेता होत्या. स्वातंत्र्य चळवळीत झोकून देणारी आणि देश स्वतंत्र झाल्यावर त्यांच्या विकासासाठी अविरत झटणारी त्यांच्या सारखी स्त्री पंतप्रधान तर शोधूनही मिळायची नाही. ३० ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांनी केलेल्या एका भाषणात त्या म्हणाल्या होत्या माझ्या देशाची सेवा करतांना मला मृत्यु आला तर मला त्याचा अभिमानच वाटेल, माझ्या रक्ताचा थेंब अन्थेंब मी या देशाच्या वैभवासाठी आणि विकासासाठी खर्च करीन आणि हा देश बलवान आणि चैतन्यदायी बनवेन ३१ ऑक्टोंबर १९८४ रोजी सकाळी काळाने त्यांच्याच अंगरक्षकाने त्यांच्यावर भ्याड गोळयांचा वर्षाव करुन त्यांची हत्या केली व एकथोर साहसी स्त्री अखेर हुतात्मा झाली. एक तेजपुंज व्यक्तिमत्व लोप पावले, सारा भारत सुन्न झाला. जग या घटनेने अचंबित झाले. त्या गेल्या पण त्यांचे उत्तुंग व्यक्तीमत्व आजही भारतीयांच्या मनावर कोरले गेले आहे. त्यांच्या ३९ व्या स्मृतिदिना निमित्त शतशः प्रणाम !

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९
ई-मेल : ििीेंळपलरसवशसारळश्र.लो

# शरीरात प्रोटीन कमी झालंय तर नुसती अंडी खाऊन भागत नाही, हे पदार्थही आहेत प्रोटीन्सचा खजिना!

शरीर तंदुरुस्त आणि निरोगी ठेवण्यासाठी सर्व पोषक तत्वांची आवश्यकता असते. सर्व पोषक घटकांपैकी प्रथिने आपल्या शरीराला बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. म्हणून, एखाद्या व्यक्तीने अशा काही पदार्थांचे सेवन केले पाहिजे जे शरीराला पुरेसे प्रोटीन प्रदान करतात.प्रथिनांचे नाव येताच सर्वात आधी अंड्यांचा विचार येतो, कारण अंड्यांमध्ये प्रथिनांचे प्रमाण सर्वाधिक असते, असे आरोग्य तज्ज्ञांचे मत आहे. म्हणूनच बहुतेक लोक अंडी नक्कीच खातात.अंड्याचा शरीराला अनेक प्रकारे फायदा होतो. भरपूर प्रथिने असण्यासोबतच जास्त वेळ भूक न लागण्याचीही खासियत आहे. वजन कमी करण्यासाठीही अंडी उपयुक्त आहे. पण जे शाकाहारी आहेत. प्रथिने मिळवण्यासाठी अंडी खाऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी त्रास होतो.अशा परिस्थितीत अंड्यांऐवजी काही शाकाहारी पदार्थ आहेत ज्यात अंड्यांपेक्षा जास्त प्रथिने असतात. चला तर मग जाणून घेऊया त्या शाकाहारी पदार्थांबद्दल ज्यांचा तुम्ही तुमच्या आहारात समावेश करून प्रथिनांच्या कमतरतेवर मात करू शकता.कडधान्यजे लोक शाकाहारी आहेत त्यांनी प्रथिने मिळविण्यासाठी अंड्यांऐवजी बीन्स, हरभरा आणि विविध प्रकारच्या कडधान्यांचे सेवन करावे. विशेषतः वाटाण्यामध्ये प्रथिने मुबलक प्रमाणात आढळतात. तुम्ही मूग डाळ भिजवून सॅलड किंवा स्प्राउट्समध्ये देखील समाविष्ट करू शकता. किंवा मसूरचे सूप बनवूनही पिऊ शकता.ग्रीक दही जर शरीरात प्रोटीनची कमतरता असेल तर तुम्ही तुमच्या आहारात ग्रीक दही समाविष्ट करू शकता. कारण त्यात भरपूर प्रथिने असतात. त्यामुळे शाकाहारी लोक अंड्यांऐवजी टोफूच्या तुकड्यांवर ग्रीक दही टाकून खाऊ शकतात. ग्रीक दही हे वनस्पती सर्वोत्तम प्रथिने आहे.मशरूम मशरूम देखील वनस्पती प्रथिनांचा एक चांगला स्रोत आहे. त्यात पुरेशा प्रमाणात प्रथिने आढळतात. तुम्ही ते उकळून किंवा मशरूमची भाजी करून खाऊ शकता. मशरूम खाल्ल्याने तुमच्या शरीराला पुरेसे प्रथिने मिळतील. एवोकॅडो प्रथिने मिळविण्यासाठी, आपल्या आहारात अंड्यांऐवजी अॅव्होकॅडोचा समावेश करा. येथे नमूद केलेले सर्व पदार्थ वनस्पती सर्वोत्तम प्रथिने आहेत जे शाकाहारी लोक आरामात खाऊ शकतात. एवोकॅडोमध्ये निरोगी चरबी आणि प्रथिने देखील आढळतात. त्यामुळे ते आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. तुम्ही अॅव्होकॅडोचे सेवन सॅलडमध्ये किंवा सँडविचसोबत करू शकता.

# जगात हिंसेला अजिबात स्थान नाही



नवी दिल्ली : हमासने इस्रायलवर ७ ऑक्टोबर रोजी केलेला हल्ला हा क्रूरच होता. परंतु त्यानंतर इस्रायली लष्कराकडून सातत्याने सुरू असलेल्या हल्ल्यात हजारो निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला आहे. इस्रायलने गाझाला जेल बनविले आहे. सुसंस्कृत जगात हिंसेला अजिबात स्थान नाही, असे सांगत काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी संयुक्त राष्ट्रात भारत सरकारच्या तटस्थ भूमिकेचा आम्ही तीव्र शब्दात निषेध करत असल्याचे म्हटले.हमासच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून इस्रायलकडून गाझातील निष्पाप मुले, महिला, वृद्धांचा विचार न करताही हल्ले थांबत नाहीत. या लोकांचा हमासशी काहीही संबंध नाही, तरी त्यांचा बळी का घेतला जात आहे, असा सवालही सोनिया गांधी यांनी उपस्थित केला.इस्रायलच्या हल्ल्यामध्ये हजारो लोकांची घरे उद्ध्वस्त झाली आहेत. शहरांचे रूपांतर इमारतींच्या ढिगा-यात झाले. नाकाबंदी करून गाझातील लोकांना अन्न, पाणी, वीज तसेच अत्यावश्यक वस्तूपासून वंचित ठेवणे हे अमानवीच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय कायद्यांचेही उल्लंघन करणारे आहे. निष्पाप लोकांचा भूकेविना बळी जाणे हे सुसंस्कृत जगाचे लक्षण नसल्याचेही सोनिया गांधी यांनी आपल्या लेखात नमूद केले आहे.दोन्ही देशांना शांततेचा अधिकार पॅलेस्टाइन आणि इस्रायल या दोघांनाही शांततेच्या वातावरणात जगण्याचा अधिकार आहे. त्यावर काँग्रेसचा ठाम विश्वास आहे. इस्रायलसोबत असलेल्या भारताच्या मैत्रीला आम्ही महत्त्व देतोच. पण, त्यांनी पॅलेस्टिनी नागरिकांना त्यांच्याच जन्मभूमीत बाहेर काढणे चुकीचे असल्याचे गांधी म्हणाल्या. काँग्रेसची भूमिका राजकीय : भाजप युद्धावर काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांनी मांडलेली भूमिका ही राजकीय असल्याची टीका भाजपने केली. ही भूमिका हमासचे अप्रत्यक्ष समर्थन करणारी आहे. त्यातून भारताच्या सुरक्षा आणि हितसंबंधांवर परिणाम करू शकतो, असे प्रवक्ते सुधांशू त्रिवेदी म्हणाले.

# आठवड्याला ७० तास काम का करू नये? मन व शरीराची काळजी घेण्यासाठी काय करावं, तज्ज्ञ सांगतात..

सुधा मूर्ती यांनी नारायण मूर्ती हे स्वतः आठवड्यातून ८० ते ९० तास काम करतात असे म्हणत ट्रोलर्सना उत्तर दिले होते. तर अन्यही काही व्यावसायिकांनी मूर्ती यांच्या विधानाला अनुमोदन दिले आहे. पण डॉक्टर याविषयी काय सांगतात हे पाहूया.. इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती यांनी तरुणांना आठवड्यातून ७० तास काम करण्याचा विचार करायला हवा अशी टिप्पणी केल्यानंतर ऑनलाइन वादाला तोंड फुटले आहे. पॉडकास्टमध्ये, मूर्ती म्हणाले की भारताची कार्य उत्पादकता जगात सर्वात कमी आहे आणि देशाचा विकास सुनिश्चित करण्यासाठी, तरुणांनी आठवड्यातून किमान ७० तास काम करणे आवश्यक आहे. नारायण मूर्ती यांच्या विधानावरून वाद सुरु असताना सुधा मूर्ती यांनी नारायण मूर्ती हे स्वतः आठवड्यातून ८० ते ९० तास काम करतात असे म्हणत ट्रोलर्सना उत्तर दिले होते. तर अन्यही काही व्यावसायिकांनी मूर्ती यांच्या विधानाला अनुमोदन दिले आहे. आठवड्याला ७० तास काम केल्याने शरीरावर काय परिणाम होऊ शकतो शिवाय अशावेळी आपण स्वतःची काळजी कशी घ्यायला हवी हे आपण मागील लेखात जाणून घेतले. तर आज आपण आठवड्याला आपण ७० तास काम करणे हे मानसिक आरोग्यावर काय प्रभाव करू शकते हे पाहणार आहोत. आजवर झालेल्या अनेक अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की, आठवड्याला ५० तास काम केल्यानंतर उत्पादकता लक्षणीयरीत्या कमी होते आणि ५५ तासांनंतर पूर्णपणे थांबू शकते. याशिवाय, प्रत्येक आठवड्यात किमान एक



पूर्ण दिवस सुट्टी न घेतल्याने इतर दिवसांच्या कामातील प्रत्येक तासाभराच्या उत्पादकतेमध्ये घट होऊ शकते. ७० तासांचा कामाचा आठवडा, पूर्ण करण्यासाठी प्रत्येक दिवशी निदान १० तास किंवा आठवड्यातून सहा दिवस जवळपास १२ तास काम करणे आवश्यक ठरू शकते. अशा रुटीनचा तुमच्या आरोग्यवर काय परिणाम होऊ शकतो याविषयी इंडियन एक्सप्रेसने मानसोपचारतज्ज्ञ डॉ. ज्योती कपूर (संस्थापक, संचालक, मनस्थळी) यांच्या हवाल्याने माहिती दिली आहे.डॉ. कपूर सांगतात की, काही व्यक्तींना काही विशिष्ट परिस्थितींमुळे किंवा नोकरीच्या गरजेमुळे अधिक तास काम करावे लागू शकते, परंतु हे रुटीन सहसा दीर्घकाळ टिकत नाही, कारण त्याचे नकारात्मक परिणाम होऊ शकतात. तर डॉ हनी सावला, अंतर्गत औषध सल्लागार, वोक्हार्ट हॉस्पिटल, मुंबई सेंट्रल यांनी सांगितले की, अधिक तास काम केल्यामुळे शरीर पूर्णपणे थकून जाते त्यामुळे कामाबद्दल वाटणारा उत्साह कमी होऊ शकतो. सतत कामाबाबत विचार करताना मेंदूवर तणाव वाढू शकतो. गायत्री मेहरा, मानसोपचारतज्ज्ञ व समुपदेशक, यांनी ७० तासांच्या कामाच्या आठवड्यात एखाद्या व्यक्तीच्या आरोग्यावर होणारे परिणाम सांगितले आहेत.हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांचा धोका वाढतो लठ्ठपणामुळे लोक फास्ट फूड आणि जेवणाच्या अनियमित वेळेचा अवलंब करतात समस्या दीर्घकाळ बसून राहणे आणि व्यायामासाठी मर्यादित वेळ दिल्याने स्नायू व सांधे नाजूक होऊ शकतात मानसिक आरोग्याच्या समस्या जसे की वाढलेली तणाव पातळी, चिंता आणि नैराश्य थकवा, अलिप्तता आणि कमी आत्मविश्वास/संतुष्टी निद्रानाश डॉ अंकिता प्रियदर्शिनी, सल्लागार मानसोपचारतज्ज्ञ आणि डॉ सम्राट शाह, सल्लागार, भाटिया हॉस्पिटल, मुंबई, यांनी आठवड्यात मर्यादेपेक्षा अधिक काम करणाऱ्यांनी काय काळजी घ्यायला हवी हे सांगितले आहे. यानुसार, व्यायाम टाळू नका. छंद जोपासा, आणि प्रियजनांसह वेळ घालवून मनाला रिफ्रेश करा. तुमच्या शरीराला आणि मनाला विश्रांतीसाठी दररोज रात्री किमान ७-८ तास झोप घ्या. दिवसभरात लहान लहान ब्रेक घ्या व नियमित आरोग्य तपासणी आणि तणाव पातळीचे निरीक्षण करा. ही काळजी घेऊनही काही वेळा कार्य उत्पादकतेच्या मर्यादा व्यक्तिपरत्वे बदलू शकतात

# ५१ कामगारांना विश्वकर्मा गुणवंत पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विशेष प्रतिनिधी मुंबई- विविध कंपन्या,आस्थापनेत काम करणारे कामगार कर्मचारी सामाजिक शैक्षणिक,सांस्कृतिक,साहित्य,कला,क्रीडा संघटन अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कामगारांना मंडळाकडून १९७९ पासून गुणवंत कामगार पुरस्काराने गौरविण्यात येत असते.कोविड च्या महामारीमुळे हा पुरस्कार सोहळा झाला नव्हता.पण सत्ताबदल झाल्या नंतर २०२३ ला विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार या नांवाने प्रदान करण्यात येत आहे.पंचवीस हजार रुपये,स्मृती चिन्ह आणि प्रशस्तीपत्र देण्यात येते यावेळी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या प्रभादेवी,मुंबई येथील हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवनाच्या प्रांगणात ३५ वा पुरस्कार वितरण सोहळा महाराष्ट्र राज्याचे मा.राज्यपाल श्री.रमेश बैस साहेब यांच्या तसेच राज्याचे कामगार मंत्री मा.ना.श्री.सुरेशभाऊ खाडे साहेब,शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना.श्री.दीपक केसरकर साहेब यांच्या शुभहस्ते आणि स्थानिक आमदार मा.श्री.कालिदास कोळंबकर साहेब,प्रधान सचिव (कामगार) मा.श्रीमती विनीता वेद सिंगल मॅडम,मुंबई शहर जिल्हाधिकारी मा.श्री.क्षिरसागर साहेब,राज्याचे कामगार आयुक्त मा.श्री.सतीश देशमुख साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत ३ महिला,४८ पुरुष एकूण ५१ कामगारांना सन्मानित




करण्यात आले. ५१ विश्वकर्मा गुणवंत कामगारांना पुरस्काराने सन्मानित करतांना मान.कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी म्हणाले की मी माझगांव डॉक मध्ये १५ वर्ष वेल्डर काम करणारा कामगार होतो.त्यावेळी मी याचं मैदानात क्रीडापटूचा सराव करून स्पर्थेत भाग घेतला आहे. माझ्या हस्ते ५१ विश्वकर्मा गुणवंत कामगारांना पुरस्काराने सन्मानित करण्याचे भाग्य मला लाभले.वेल्डर कामगार ते आमदार कामगारमंत्री हा प्रवास कामगारांच्या आशीर्वादाने यशस्वी झाला. तुमचा सत्कार करण्याची सुवर्ण संधी मला लाभली. म्हणून आपण ही असे गुणवंत कामगार न राहता सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक,साहित्य,कला, क्रीडा संघटन अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्यकरत राहवे.असे सुरेश भाऊ खाडे यांनी आवाहन केले.कामगार भूषण पुरस्कार हा (एक) दहा वर्ष गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त कामगारांना देण्यात येतो.यावर्षी श्री.मोहन गोपाळ गायकवाड इलेक्ट्रीशियन टाटा मोटर्स लिमिटेड पिंपरी पुणे.यांना ५०००० हजार रुपये पुरस्कार स्मृतीचिन्ह,प्रशस्तीपत्र यांना देण्यात आला. रावबहादूर नारायण मेंघाजी लोखंडे कामगार मित्र पुरस्कार हा कामगारांच्या कल्याणासाठी किमान २५ वर्ष समर्पित वृतीने कार्य करणाऱ्या व्यक्ती किंवा संघटनेला या पुरस्काराने गौरविण्यात येते,यावर्षी हा पुरस्कार ७५००० रुपये स्मृती चिन्ह व मानपत्र भारतीय मजदूर संघ महाराष्ट्र प्रदेश यांना देण्यात आला. सर्व पुरस्कारार्थींचे हार्दिक अभिनंदन.आणि शुभेच्छा देण्यात आल्या.या सोहळ्याच्या आयोजनासाठी श्री.रविराज इळवे कल्याण आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सर्व संबंधित अधिकारी आणि कर्मचार्यांनी प्रचंड मेहनतीचे घेतलेली त्यांचे मा.मंत्री महोदय आणि मा.प्रधान सचिव यांनी कौतुक केले.

# मराठा आरक्षणाचे खरे मारेकरी उद्धव ठाकरे

मुंबई : मराठा आरक्षणाचे खरे मारेकरी उद्धव ठाकरे आहेत, अशा शब्दांत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घणाघात केल आहे. मराठा आरक्षणावर बोलण्याचा त्यांना नैतिक अधिकार नाही, असंही त्यांनी म्हटले आहे. ठाकरेंनी सकाळी पत्रकार परिषदेत आरक्षणाच्या मुद्द्यावरुन सरकारवर टीका केली होती. त्याला प्रत्युत्तर मुख्यमंत्र्यांनी दिलं.मराठी बाण्यावर आणि मराठा आरक्षणावर बोलण्याचा त्यांना नैतिक अधिकार नाही. कारण मराठा समाजाबद्दल त्यांना किती संवेदना आहे हे मराठा समाजाला आणि आम्हालाही माहिती आहे. ज्या काळात देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते त्यावेळी मराठा समाजाला आरक्षण दिलं. हायकोर्टात ते चॅलेंज झालं, पण ते टिकवण्याचं



काम देवेंद्रजी आणि आम्ही केलं.पण सुप्रीम कोर्टात गेल्यानंतर मुख्यमंत्री कोण होतं? उपसमितीचं अध्यक्ष कोण होतं? असा सवाल करत यांनी हे आरक्षण टिकवलं नाही. त्यामुळं मराठा समाजाचे खरे मारेकरी तुम्ही आहात. त्यामुळं तुम्हाला यावर बोलण्याचा नैतिक अधिकार नाही.

# राज्यातील सर्व कामगारांसाठी जाहीर विनंती

संपूर्ण राज्यात कामगार कर्मचा-यावर मोठया प्रमाणात अन्याय अत्याचार चालू आहेत. तथा कोणीही आवाज उठविण्यास तयार नाही कारण त्यांच्या घरात परिवारांचे लोक असे म्हणतात की, आपणच एकटयाने ख-यासाठी आवाज उठविण्याचा प्रयत्न केला किंवा संघटनात सहभागी झाल्यास आपल्याला कामा वरूण काढले जाईल आणि आपली पगार बंद होईल. म्हणून या भिती दहशतीने आपल्या न्याय हक्काकरिता कोणीच कामगार कर्मचारी जमा होऊन बोलत नाही काही कारणाने प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव मध्ये राहून पूर्वी व आता पर्यंत कामगारांची फार मोठी नुकसान होत आलेली आहे यातून कामगार वर्गात हमेशा निराशा दिसून येते. परंतु कामगार कायद्याने भांडयाला कोणीच पुढे येत नसून कायदा नियमाने लेखी व तोंडी कार्यवाही करायला घाबरतात. आणि विनाकारण अन्याय पिळवणूक सहन करित राहतात. यासाठी सर्वांनी असा खरा विचार करावा की, आपले जसे लेकर बाळ आहेत तसेच इतर कामगार कर्मचा-यांचे सुद्धा मुल बाळ आपल्या लेकरा बाळा सारखे समान धरावे व अशी आपली योग्य समजूत बनवावी. जोपर्यंत आपल्यात ही जाणीव भावना उत्पन् होणार नाही व एकमेकांपर्यंत पोहचार नाही तोपर्यंत सर्वच जण माणुसकीच्या आपल्या समान न्याय हक्का पासून कायम वंचित राहून नेहमी कामगारांत फूट पडल्याने किंवा कामगारांमध्ये असमता भेदभाव राहिल्याने कामगारांना नेहमीच आपल्या सामूहिक वैयक्तिक मूलभूत समस्या सोडविण्यास कधीच संधी भेटणार नाही त्यासाठी आपले प्रश्न मागण्या तक्रारीचे खरे निवारण होण्याला आपण स्वतः सर्वांनी वरील प्रमाणे मनात खरा विचार रूजवून माणुसकीने वागणे दाखवूण देणे आहे. तसेच सर्व क्षेत्रातील खाजगी व सरकारी क्षेत्रात काम करणा-या कामगारांनी एकत्र येऊन आपले संघटन बनवून संघटना निर्माण करायला कामगारांच्या मनात एकता व समानताची खरी भावना राहिल्या शिवाय सर्वांना सामाजिक व आर्थिक न्याय मिळणे अशक्य वाटते. तथापि सर्वांनी संघटन करण्यास कार्यकारणी तयार करून संघटना स्थपना करण्याची सुरवात करावी तरच बचाव होणार आहे नसता कामगारांच्या मागण्यांना जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून कामगारांचे हक्क अधिकार नाकारले जातील. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात तुम्ही तुमचे हक्क अधिकार मागितले नाही तर तुम्हास गुलाम समजले जाऊन तुम्हाला खोटया लोकांची गुलामी करावी लागेल. यामुळे अगर सर्वांनी मनातून ठरविले तर काहिच अशक्य नसून नियम प्रमाणे कार्यवाही पाठपुरावा केल्यावर खाजगीकरण धोरण रद्द होणे शक्य आहे. तसेच सर्व शासकीय अशासकीय रोजंदारी कंत्राटी हंगामी मजूर कामगार व नियमित सेवेत असणारे कर्मचारी वर्ग यांना हा महत्वाचा मेसेंज व ही विशेष माहिती त्यांच्या पर्यंत पोहचविण्यास सेंट करुन पाठवून सहकार्य करणे ही विनंती. भारतीय संविधान जिंदाबाद ! कामगार एकता जिंदाबाद ! जय भारत जय संविधान ! जय भिम !!!

रमेश कांबळे रा. परतूर जि. जालना मो. नं. ८८०५५८२४८०, ९३७३१२५६७५

# लातूरची शांततेची परंपरा कायम राखून प्रशासनाला सहकार्य करा - जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे

## मराठा संघटनांच्या प्रतिनिधींना पोलीस अधीक्षक कार्यालयातील बैठकीत आवाहन

लातूर, दि. ३१ (जिमाका) : लातूर जिल्ह्याला शांततेची पूर्वापार परंपरा आहे. तीच परंपरा यापुढेही कायम राहावी, यासाठी मराठा समाजाचे प्रतिनिधी आणि मराठा बांधवांनी जिल्हा प्रशासनाला सहकार्य करावे. कायदा व सुव्यवस्थेला गालबोट लागेल, असे कृत्य कोणीही करू नये, यासाठी मराठा समाज प्रतिनिधींनी त्यांचे प्रबोधन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात सोमवारी रात्री झालेल्या मराठा समाज प्रतिनिधींची बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर जिल्हाधिकारी सुनील यादव, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्यासह मराठा समाजाच्या संघटनांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.सकल मराठा समाजाने आजवर शांततेने आंदोलन केले असून जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था कायम राहण्याच्या दृष्टीने यापुढेही या आंदोलनाला गालबोट लागणार नाही, यासाठी मराठा समाज प्रतिनिधींनी दक्षता घ्यावी. तसेच या आंदोलनाला गालबोट लावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना वेळीच बाजूला करून त्यांचे प्रबोधन करावे. कोणीही कायदा हातात घेवू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले. लातूर जिल्ह्याची परंपरा कायम शांतता आणि सौहार्दतेची राहिली आहे. ही परंपरा कायम राहावी, यासाठी मराठा समाजाच्या विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी सामंजस्याची भूमिका घेवून समाज बांधवांना मार्गदर्शन करावे. कोणत्याही स्थितीत जिल्ह्यात अनुचित घटना हाडु नयेत, जिल्ह्यातील शांतता अबाधित रहावी, यासाठी मराठा समाजाच्या विविध संघटनांचे पदाधिकारी व मराठा समाज बांधवांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले. तसेच शांततेत सुरु असलेल्या या आंदोलनाला गालबोट लागू नये, सामान्य नागरिकांना त्रास होवू नये, याची दक्षता घेण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच बाहेरून येवून शांततेत सुरु असलेल्या आंदोलनाला गालबोट लावण्याचा प्रयत्न केल्यास, अशा व्यक्तींवर कारवाई केली जाईल, असे त्यांनी सांगितले.सोशल मिडीयावरील अफवांवर विश्वास ठेवू नका : पोलीस अधीक्षक सोमय



मुंडे मराठा समाजाचे आंदोलन जिल्ह्यात शांततेत सुरु असून त्याला आतापर्यंत कोणतेही गालबोट लागलेले नाही, याचे सर्व श्रेय मराठा समाज बांधवांना आहे. यापुढेही हे आंदोलन शांततेत सुरु राहावे, यासाठी मराठा समाजाने प्रशासनाला सहकार्य करावे व पोलीस प्रशासनाला वेळोवेळी माहिती द्यावी. जेणेकरून आंदोलनात कोणतेही समाजकंठक सहभागी होवून जाळपोळ, तोडफोड करणार नाहीत. मराठा समाज बांधवांनी सोशल मिडियावरील अफवांवर विश्वास न ठेवत सामंजस्याची भूमिका घेवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले. तसेच पोलीस प्रशासनाचे सोशल मिडीयावर बारकाईने लक्ष असल्याचे त्यांनी सांगितले.

# आदर्श समाज रचना निर्मितीसाठी धम्म चळवळ महत्वाची.! -पुज्यभंते महाविरो थेरो यांचे प्रतिपादन

अहमदपूर :- जगाच्या पाठीवर बौद्ध धम्म हा शांतता प्रस्थापित करणारा धम्म म्हणून ओळख आहे. आज घडीला समाजात आदर्श धम्म उपासक उपासिकांची निर्मिती होणे काळाची गरज असून बौद्ध उपासक उपासिका यांनी आदर्श समाज निर्मितीसाठी धम्म चळवळी मध्ये योगदान द्यावे असे आवाहन पूज्य भंते महाविरो थेरो यांनी केले.

तक्षशिला बुद्ध विहार काळेगाव तालुका अहमदपूर येथे प्रतिवर्षाप्रमाणे वर्षावास समापन सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित धम्मदेसना कार्यक्रमात ते बोलत होते. सूरूवातीला बूध्दविहार येथे धम्मध्वजारोहन, परित्राण पाठ,भिक्खू संघास भोजनदान, उपासकांना भोजनदान, मान्यवरांचे स्वागत आणी मनोगत असे विविध कार्यक्रम संपन्न झाले. या वेळी धम्मपिठावर भिक्खू पुज्य सरणंकर थेरो नागपूर,पुज्य थेरो सातारा,पुज्यमहाविरोथेरोकाळेगांव,पुज्यभंतेधम्मघोषनागपूर,पुज्य बोधीधम्मो गोळेगांव-नांदेड,श्रामनेर सोनूत्तर,श्रामनेर राहूल आदी सोबत प्रमुख पाहूणे म्हणून माजी मंत्री बाळासाहेब जाधव,माजी आमदार बब्रूवान खंदाडे, गणेशदादा हाक्के पाटील,आंबेडकरी मिशनचे प्रमुख दिपक कदम,वंचीत आघाडीच्या शहराध्यक्षा सूजाताताई अजनीकर, सा.बां.उपअभियंता हात्ते, एन.व्ही.मोटे आदींची उपस्थिती होती. या प्रसंगी स्वागताध्यक्ष डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले.तर प्रमुख वक्ते दिपक कदम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.यावेळी उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन पर भाषणे संपन्न झाली. तदनंतर पुज्य भंते महाविरो यांची धम्मदेसना संपन्न झाली.






पूढे बोलताना भंते महाविरो म्हणाले की,आग घडीला धम्म आचरण खूप महत्वाचे आहे.शिक्षणामूळेच सर्वांची प्रगती होवू शकते म्हणून ज्ञान प्राप्तीसाठी कठोरातील कठोर परिश्रम घेण्याची तयारी ठेवावी.मनाच्या शांती समाधानासाठी विप्पश्यनेचा ध्यानाचा मार्ग अवलंब करावा असेही अवाहन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवकनेते विनोदभाऊ खटके, स्वागताध्यक्ष डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी, एम.एन. गायकवाड,प्रा.डी.बी.शिंदे,गौतम सोनकांबळे, एल.डी. कांबळे,किशन गायकवाड,रमाकांत कांबळे,शेषेराव ससाणे,रघू धनगांव,खंडेराव साबळे, पंढरी वाघमारे,सुभाष चव्हाण,सूशिल चिकटे,नितीन सरकाळे आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमास हजारों उपासक उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा समाजाला तत्काळ आरक्षण देवून राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करा

लातूर - मराठा समाज विविध आंदोलनांच्या माध्यमातून करीत असलेली मराठा आरक्षणाची मागणी तात्काळ मान्य करून महाराष्ट्रात शांतता व सुव्यवस्था निर्माण करावी, या आशयाचे निवेदन लातूरच्या पत्रकारांनी आज ३१ ऑक्टोबर रोजी लातूरच्या जिल्हाधिकार्यांमार्फत महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांच्याकडे यांना दिले आहे.

**लातूरच्या पत्रकारांचे जिल्हाधिका-यांमार्फत राज्यपालांना निवेदन**

मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे, म्हणून मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात समग्र मराठा समाज गावागावात सनदशीर मार्गाने आमरण उपोषण, रास्ता रोको असे विविध माघ्यमातून आंदोलने करीत आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाची मागणी गांभीर्याने घेवून राज्यपाल रमेश बैस व मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी तत्काळ मान्य करावी आणि राज्यात शांतता आणि सुव्यवस्था निर्माण करावी. अशी मागणी लातूरच्या पत्रकारांनी सदर निवेदनात केली आहे. सदरचे निवेदन अप्पर जिल्हाधिकारी विजयकुमार ढगे यांना देण्यात आले. निवेदन देणार्या शिष्टमंडळात ज्येष्ठ पत्रकार रघुनाथ बनसोडे, लातूर जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरसिंह घोणे, हरिश्चंद्र जाधव, शिवाजी कांबळे, लिंबराज पन्हाळकर, अमरजित बनसोडे, मासूम खान आदी पत्रकारांचा समावेश होतो. राज्यपालांना पाठवलेल्या निवेदनावर पत्रकार रघुनाथ बनसोडे, नरसिहं घोणे, महेंद्रकुमार जोंधळे, हरिश्चंद्र जाधव, शिवाजी कांबळे, लिंबराज पन्हाळकर, अमरजित बनसोडे, मासूम खान, अमोल इंगळे, रवि बिजलवाड, विष्णू आष्टेकर, लहुजी शिंदे आदींसह इतर पत्रकारांच्या स्वाक्षर्या आहेत.



# नांदेड जिल्ह्यातील मौजे जैतापूर येथील मराठा ग्रामपंचायत महिला सदस्यांनी दिला राजीनामा

नांदेड :- नांदेड जिल्ह्यातील मौजे जैतापूर येथील मराठा ग्रामपंचायत महिला सदस्यांनी दिला राजीनामा संपूर्ण राज्यात सुरू असलेल्या मराठा आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनात अंतरवाली सराटी येथील आमरण उपोषणाचा जाहीर पाठिंबा देत व अंतरवली सराटी येथील आंदोलकांवर दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घ्यावे मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र समावेश करावा या मागणी करिता व मराठा आरक्षण मिळण्यासाठी ग्रामपंचायतीने घेतलेला ठराव राजकीय नेते पुढारी कार्यकर्ते यांना गाव बंदी करण्यात आलेली आहे याकरिता सदरील जैतापूर येथील ग्रामपंचायत महिला सदस्य यांनी विशेष म्हणजे सर्व मागासवर्ग या महिलांनी दिला सदस्य पदाचा राजीनामा त्याची नांव आहेत देव बाई मारोती सातोरे राखिबाई मारोती जाधव त्रिवेणी ज्ञानेश्वर शिंदे कोमल बाई संजय सरोदे आनंद मारोती जाधव ग्रामपंचायत जैतापूर येथील सदस्य विषेश म्हणजे मराठा आरक्षणासाठी मनोज जरागे पाटील यांच्या स्मरणार्थ अंतरवाली सराटी येथील आमरण उपोषणाला जाहीर पाठिंबा देत कोणत्याही राजकीय नेत्यांना गावं बंदी करण्यात आली.




# मतदार संघाचा विकास करण्यासाठी प्रयत्नशील फक्त जनतेची साथ महत्त्वाची आ.शेखर निकम यांचे मुंबईस्थित कडवई जि.प.गट मेळाव्यात मार्गदर्शन

मुंबई/ प्रतिनिधि: चिपळूण संगमेश्वर मतदार संघातील जिल्हा परिषद गटनिहाय मुंबईकर चाकरमान्यांचे मेळावे मुंबईत घेण्याचे केलेले नियोजन यशस्वी होत असून या मतदारसंघातील राजकारणास नवीन उभारी देणारे ठरत आहे. या मेळाव्यांची सुरवात ओझरे जिल्हा परिषद या गटातील मुंबईतील ग्रामस्थ मेळाव्याच्या अलोट गर्दीने यशस्वी झाली. त्यानंतर दि. २९.१०.२०२३ रोजी कडवई जिल्हा परिषद गट व मुचरी पंचायत समिती गण हा मेळावा त्यास ठिकाणी दादर येथे महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट, श्रीकृष्ण मंदिर सभागृहात आमदार निकम यांच्या उपस्थितीत चाकारमान्यांच्या तुफान गर्दीने पार पडला. आ. शेखर निकम यांनी मतदार संघातील कडवई जि. प. गट व मुचरी प. स. गणात जवळ जवळ ८३ कोटी १९ हजार रुपयांचा निधी मंजूर करुन कला, क्रिडा, सास्कृतिक, सामाजिक, शिक्षण क्षेत्राचा विकास केला आहे. रखडलेले विविध प्रकल्प आणि पर्यटनदृष्टया विकासाच्या योजना यांच्यामुळेच मतदारसंघात आकार घेऊन विकासाच्या दृष्टीने वाटचाल करत आहेत. यातूनच गावात झालेली विकासकामे आणि मुंबईकर चाकरमान्यांच्या अपेक्षा जाणून घेण्यासाठी आमदार निकम यांनी मतदार संघातील जिल्हा परिषद गटनिहाय मुंबईकरांचे मेळाव्यांचे आयोजन केलेले आहे. या मुंबईस्थित कडवई जिल्हा परिषद गट व मुचरी पंचायत समिती गण या मेळाव्यास सुद्धा चाकरमान्यांनी तुफान गर्दी झाली होती. लोकांच्या हृदयात आदराचे स्थान निर्माण केले आहे त्याची प्रचिती या मेळाव्याच्या गर्दीतून जाणवत होती. जनतेला आपली सुख-दु:ख जाणून घेणारा हक्काचा माणूस मिळाला आहे आणि एक आदर्श राजकारणीं मिळाल्याचे समाधान या गर्दीतून दिसत होते. आमदार शेखर निकम यांनी मेळाव्यात मार्गदर्शन करताना म्हणाले की, आपल्या सर्वाच्या आशिर्वादाने आमदार झालो अन महामारीम नैसर्गिक आपत्ती, राजकारणातील विचित्र होणा-या घडामोडी यामुळे विकास कामे करताना खुप अडचणी आल्या. त्यातून माझ्या परिने विकास कामे केली, आपल्याशी गाठी भेटी सुद्धा होत होत्या मात्र एकत्रीत असा भेटण्याचा अन आपल्याशी विकास कामांबाबत बोलण्याचा व संवाद साधण्याचा योग येत नव्हता तो मेळाव्यात आला. मेळाव्यातील आपल्या बहुसंख्य उपस्थितीने आपले प्रेम अनुभले. कोणत्याही आमदारास जेवढे प्रेम मिळत नसेल तेवढे प्रेम मला आपल्या कडून मिळत आहे यांचे मला समाधान वाटले. कडवई जिल्हा परिषद गट येथे ५६ कोटी ८० लाख २५ हजार व मुचरी पंचायत समिती गण येथे रु. २६ कोटी ३९ लाखाचा निधी मिळाला आणि जो आपला विकास झाला तो प्रत्येक कार्यकर्ता शेखर निकमांमुळे झाला असे म्हणत आहेत. मात्र हा विकास माझ्या एकट्यामुळे झाला नसून मा. उपमुख्यमंत्री अजितदादा यांच्या सहकार्यामुळेच शक्य झाला आहे आणि म्हणूनच अजितदादा यांना आपण सर्वानीच कायम साथ देणे क्रमप्राप्त आहे. काही लोक म्हणतात काहीही बोलत आहेत. तस काही नसुन हा जो काही मी निर्णय घेतला तो माझ्या स्वत:साठी नसून जनतेच्या अन मतदार संघाच्या विकासाठी आहे हे तुम्ही सर्व जाणून आहात.

रस्ते, पाखाड्या झाल्या म्हणजे विकास झाला असं नाही तर शेती व पर्यटन यांचा विकास करत या माध्यमातून युवकांना नोकरी धंदे निर्माण करुन रोजगार निर्मिती झाली तरच विकास झाल्याचे सार्थक होईल. त्यामुळे गावातील लोकांनी आपल्या जमिनी विकुन आपल्याच पायावर धोंडा मारुन घेऊ नका. पाणी टंचाईसुद्धा पुर्णपणे नष्ट करण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत त्यासाठी छोटे-छोटे बंधारे बांधणे व तालुकास्तरीय छोट्या छोट्या बधा-याची दुरुस्ती करणेसाठी पाठपुरावा चालू आहे सर्व गोष्टी मा. आजितदादा पवार यांच्या माध्यमातून आपण पुर्ण करुन घेऊ शकतो आणि आपण हा विकास आगामी काळात निश्चित करु.

सांस्कृतिक, क्रिडा व शिक्षण क्षेत्रात आपणास जिथे जिथे अडचणी येतील तिथे मार्गदर्शकाप्रमाणे उभा राहुन आपणास मोलाचे सहकार्य करेन. समाज्यात वावरताना एकमेकांशी राजकीय मतभेद ठेवू नका कारण ज्यांच्यासाठी तुम्ही करता ते काही मिनीटातच एकत्र चहापान करतात. माझा आजही कोणही मोठा राजकीय मार्गदर्शक नेता नाही आणि कालही नव्हताच. सामान्य जनतेची साथ, हाच माझा विश्वास आणि ही साथ कायमची हवी आहे अशी भावनिक साद घातली.

प्रदेश सरचिटणीस दिनकर तावडे म्हणाले की एखाद्या आमदाराने जि.प. गटासाठी कोट्यावधी पेक्षा जास्त निधी खर्च करणारे आमदार शेखर निकम हे महाराष्ट्रातील एकमेव असे आमदार असतील राजकारणात नम्र असून मृदूभाषी आहेत प्रत्येकाला आपलंस वाटणारे नेतृत्व आहे. मा. आजिदादा यांचे जवळचे व आवडते आमदार आहेत. मतदार संघाचा विकास करावयाचा असेल तर अजितदादांच्या नेतृत्वाखाली काम करत त्यांना साथ देणे गरजेचे आहे असे मला वाटते. मुंबईस्थित चाकरमान्यांनी म्हणाले प्रत्येक माणसाच्या हृदयात वेगळे स्थान व आपुलकीचे स्थान निर्माण करणा-या आमदार शेखर निकम यांना कायम खंबीरपणे साथ देऊ. यावेळी श्री. दिनकर तावडे (सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश रा.कॉं. पार्टी), दिशा दाभोळकर (महिला सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश रा.कॉं. पार्टी), सौ. पुजाताई शेखर निकम (माजी सभापती, पं.स.चिपळूण), श्री. राजेंद्र सुर्वे (संचालक, आरडीसी बँक रत्नागिरी), श्री. राजेंद्र पोमेंडकर (रा.कॉं. पार्टी, तालुका अध्यक्ष-संगमेश्वर), श्री. बाळूशेठ ढवळे (रा.कॉं. पार्टी, प्रमुख संघटक, संगमेश्वर तालुका), श्री. पंकज पुसाळकर (रा.कॉं.पार्टी, युवक तालुकाध्यक्ष, संगमेश्वर तालुका), नितीन भोसले, बाळा पंदेरे, मंगेश बांडागळे, गणपत चव्हाण, सुबोध चव्हाण, तुकाराम येडगे (रा.कॉं.पार्टी, जिल्हा सरचिटणीस, संगमेश्वर तालुका), आण्णा पांचाळ (सायले), सुनिल कदम (फणसवळे), संतोष कांबळे (मुचरी), सिद्धार्थ सावंत (तांबेडी), संतोष घाग (काटवली), दत्ताराम शेळके (धनगर समाज अध्यक्ष), जयेश गोमाणे, संदिप मोरे, विजय घोरपडे, विजय साळुंखे, बाळकृष्ण ब्रीद, बापू ओकटे, राजू पवार, अनिल चव्हाण (शृंगारपूर), अशोक घोसाळकर, राजेंद्र ओकटे, अभय कदम (कडवई), आत्माराम करंडे, गणपत जाधव (गोळवळी), सुरेश डिके, मनोहर जाधव, बाबु हरेकर (तुरळ), हरिश्चंद्र पवार, चंद्रकांत भडवळकर (राजवाडी), महेंद्र मोहिते, विष्णू पंडव, विजय साळुंखे (चिखली), प्रदिप म्हादे (शेंबवणे), सिद्धार्थ सावंत, प्रशांत रागंणेकर (रांगव), चिंतामणी कदम (शेंनवडे), निलेश खताते (शिंदे अंबेरी), सुधाकर ब्रीद (मासरंग), अनिल पवार, मिलिंद पवार (धामणी), अनिल घोरपडे, अनंत पवार (कारभाटले), सुरेश साटले, रमेश पाले (तिवरे), विश्वास तावडे (नायरी), शिवराम धांगडे, अनिल चव्हाण (शृंगारपूर), रघुनाथ घडशी (निवळी), सुरेश धांगडे (कातुर्डी), शांताराम मालप (अणदेरी), रंगराव जाधव (पाचांबे), लहु उमासरे (हेदली), भगवान कदम (कुचांबे), गणेश येडगे (राजिवली), बाबाराव कोंडविलकर, श्रीपत सुर्वे, श्रीकांत साळवी (कुळ्ये), दत्ताराम घडशी, दिलीप धामणे (विघ्रवली), संतोष घाग (काटवली), विजय पांचाळ (सायले), प्रमोद खेडेकर, सिताराम मोहिते, रुपेश कांबळे (सोनवडे), आत्माराम भुरवणे (तेर्ये), प्रकाश सोनार (बोरसुत), सचिन गावडे, प्रमोद गावडे (वाशी तर्फे संगमेश्वर), राम पवार, राजू पवार, प्रदिप कांबळे (फणसवळे), शांताराम पवार (देवाळे), वसंत तटकरे, संतोष मोरे, मंगेश गोसावी, गिता मोरे, गंगाराम टोपरे (मुचरी) इ. कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. हा मेळावा राजेंद्र सुर्वे, राजेंद्र पोमेडकर, संतोष भडवळकर, संकेत खामकर, विकास बेटकर, अनिल नांदळजकर, आण्णा पांचाळ, रघुनाथ भालेकर, महेश नांदळजकर, राजाराम गोवळकर, राजाराम इंदुलकर, सुभाष जाधव, राजेंद्रबोथरे, राजेंद्र घोसाळकर, सुधीर इंदुलकर, दीपक चव्हाण, अजय साबळे, बाबू इंदुलकर, सुभाष जाधव, विनोद कदम, रमेश डिके, इ. पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मेहनतीने यशस्वीरीत्या पार पडला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजेंद्र पोमेंडकर अन सूत्रसंचालन दीपक चव्हाण व महेश नादळजकर यांनी केले.





PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE